दै. लोकमत दि. 10.03.2025

# खबरदार! धूळवडीवर राहणार पोलिसांचा 'वॉच'

## भरधाव वाहनांसाठी २४ तास पहारा : कारवाईचा इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क


**नांदेड :** १३ आणि १४ मार्च रोजी होळी व धूलिवंदन सणाच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यावर पोलिसांचा भर आहे. त्यासाठी ठिकठिकाणी धूलिवंदनावर पोलिसांचा वॉच राहणार आहे. रंग लावण्यावरून किंवा जुन्या वैमनस्यावरून उद्भवणारी भांडणे पुढे वाढू नयेत, रक्तरंजीत घटनेत त्याचे रूपांतर होऊ नये, याची काळजी पोलिसांकडून घेतली जाणार आहे.

होळी व धूलिवंदन हा सण तसे पोलिसांचे टेन्शन वाढविणारा आहे. लोक सण-उत्सव साजरा करीत असताना, धूलिवंदनाच्या दिवशी पोलिस यंत्रणा मात्र डोळ्यात तेल घालून काम करताना दिसते. धूलिवंदनाच्या दिवशी रस्त्यावर आणि चौकाचौकात तगडा पोलिस बंदोबस्त तैनात केला जातो. या दिवशी दारू पिऊन वेगात वाहन चालवणाऱ्यांची संख्या मोठी असते.

एकाच दुचाकी वाहनावर तीन ते चार जण प्रवास करतात. अशांना वठणीवर आणण्यासाठी पोलिस रात्रीपासूनच रस्त्यावर तैनात असतात. त्याचबरोबर विना सायलेन्सरच्या दुचाकींच्या आवाजाने नागरिकांनाही हैराण करून सोडले जाते. एवढेच नव्हे, तर होळी, धूलिवंदनाच्या दिवशी भांडणांचा, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्याचा इतिहास असलेल्या गावांमध्ये पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला जातो.

### धुळवडीचा इव्हेंट

अलीकडे धूळवड हा जणू इव्हेंट झाला आहे. अनेकजण यानिमित्ताने आपल्या फार्म हाऊसवर किंवा सोयीच्या ठिकाणी पार्टी आयोजित करतात. बंदिस्त भागात ही पार्टी राहत असल्याने पोलिसांना त्याचा फार ताण नसतो. मात्र, रस्त्यावर दारू पिऊन धिंगाणा घालणे, मोठ्या आवाजात आणि वेगाने वाहने पळविणाऱ्यांवर मात्र पोलिसांचा वॉच राहतो. या दिवशी मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.



### क्रियाशील गुन्हेगारांना प्रतिबंधात्मक नोटीस

१ भांडणाचा इतिहास असलेल्या हिस्ट्री शीटर व इतर क्रियाशील गुन्हेगारांना आधीच नोटीस बजावली जाते. शिवाय त्यांच्यावर सतत वॉचही ठेवला जातो.

२ त्यानंतरही दुसऱ्या दिवशी विनयभंग, भांडणांच्या अनेक तक्रारी पोलिस ठाण्यात दाखल होतातच. अनेकांना मारहाणीमुळे रुग्णालयात भरतीही करावे लागते.

३ एकूणच होळी व धूलिवंदनाचा सण शांततेत पार पडावा, कायदा व सुव्यवस्थेला कुठेही गालबोट लागू नये, यासाठी पोलिसांना शर्थीचे प्रयत्न करावे लागतात.

४ नागरिक अंगाला रंग लावून धूळवड साजरी करीत असतात. पोलिस मात्र कपाळाला टिळा लावून रात्रीपासूनच २४ तास रस्त्यावर आपली ड्युटी बजावत असतात.

### जुने हिशोब चुकते

क्षुल्लक कारणावरून, रंग लावण्यावरून भांडणे होतात. त्यातच काही जुने वादही उफाळून येतात. दारूच्या नशेत भांडणे, मारामारी, खुनासारखे प्रयत्न झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. अशा घटनांपासून धडा घेत त्याला प्रतिबंध घालण्यासाठी पोलिस आधीच तैनात केले जातात. धूळवडीच्या दिवशी दारू मिळू नये, म्हणून दुकाने बंद असतात. मात्र, पिणारे आधीच आपली व्यवस्था लावली जाते.